
# स्वामी रामतीर्थांच्या गोष्टी

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा० वाठ
दा. क्र. १२२७२



IRBK-0112272

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 92262 नों. दि ..........
वि. बाल वाङ्मय क्र. ..........

# स्वामी रामतीर्थांच्या गोष्टी

## भाग १ ला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संपूर्ण योजना
१९७०

गो. प्र. भावे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५५९९० वि बालवाङ्मय
क्रमांक ३६०३ नोंद दि

मूल्य

IRBK-0112272

नव ज्योति प्रकाशन : मुंबई २८

□ आवृत्ति पहिली
मे १९६८
( आद्य शंकराचार्य जयंती ) शके १८९०

□ सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

□ प्रकाशक :
सौ. लता जोशी
नव ज्योति प्रकाशन
दादर-मुंबई २८

□ मुद्रक :
बाबर व भंडारी कं.
३४२ नारायण पेठ
पुणें २

■ अनुक्रम

■

| | | |
|---|---|---|
| १. | दूध व साधु—मनमोकळें दान | ५ |
| २. | देवदूत व भक्त—नकळत लोक कल्याण | ६ |
| ३. | तालीमबाज व न्हावी—खोटी बढाई | ९ |
| ४. | राणी व सोन्याच्या विटा—मोह आवरा-ध्येय गांठा | ११ |
| ५. | बहुरूप्यांचा सिंह—भाव तैसा देव | १३ |
| ६. | घोडा व सांबर—दिखाऊ विजय पण कायमचें दास्य | १७ |
| ७. | सज्जन धन्याचा नाठाळ नोकर—मनोविजयी तो विश्व विजयी | १८ |
| ८. | वृंदावनातील गोपाळ कृष्ण—निष्पाप बालभाव | २० |
| ९. | दोन जिवलग मित्र—इच्छा सोडा म्हणजे त्या पूर्ण होतील | २१ |
| १०. | औरंगजेब व शहाजहान—<br>अमर्याद महत्त्वाकांक्षा सोडा व सुखी व्हा | २२ |
| ११. | स्त्री व तिचा फोटो—भावी घटनांचें आगाऊ प्रतिबिंब | २४ |
| १२. | ९९ चें जाळें—चिंताक्रांत श्रीमंत व समाधानी गरीब | २६ |
| १३. | राजा व संन्यासी—समाधान हेंच वैभव | २९ |
| १४. | डोळे देणारा साधू—आग्रक स्त्रीत्वावर विजय | ३० |
| १५. | लैला व मजनू—दिव्य प्रेम | ३३ |
| १६. | जीव व परमात्मा—खरा आनंद | ३४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
क्रमांक ...१४५७९२... दि. ...
...७००३... नोंद दि. ...

# स्वामी रामतीर्थांच्या गोष्टी

## भाग पहिला

### १ : दान देतांना मोकळ्या मनानें द्या.

एकदां एका शहरांतून एक साधू रस्त्यानें चालला होता. त्याला पाहून एक स्त्री त्याच्या जवळ गेली व त्याला म्हणाली " महाराज, कृपा करून आपण माझ्या घरीं चलावें. " ती विनंति साधूनें मान्य केली व तिजबरोबर तो तिच्या घरीं गेला.

घरीं येतांच त्या स्त्रीनें साधूस बसावयास आसन दिलें व म्हणाली, " मी आपणाला दूध आणून देतें. तें घ्यावें. "

घरांत चुलीवर दूध तापत होतें. तें खरपूस तापून त्याच्यावर चांगली साय ( मलई ) आली होती. त्या दुधापैकीं एक प्यालाभर दूध साधूस देण्यासाठीं ती स्त्री तें दूध प्याल्यांत ओतूं लागली. तों चटकन् सर्व साय त्या प्याल्यांत पडली. हें पाहून तिच्या तोंडून सहजगत्या " अगबाई, हें काय भलतेंच झालें ! " सामान्यतः आपल्या देशांतील स्त्रिया दुधावरील मलई संबंधी फार जपतात. होता होईतों ती साय दुसऱ्याला देऊं नये अशी त्यांची प्रवृत्ति असते. या वृत्तीमुळें तिच्या तोंडून वरील उद्गार निघाले. दूध द्यावें पण त्यावरील मलई न द्यावी ही तिची इच्छा. पण काय करणार प्याल्यांत साय तर पडली. त्यामुळें नाइलाजानें पण अनिच्छेनें त्या दुधांत साखर घालून तो दुधाचा प्याला त्या साधूपुढें ठेवून ' हें दूध घ्या ' असें

त्यास म्हणाली. तो प्याला तसाच ठेवून साधूनें तिच्याजवळ बोलण्यास सुरवात केली.

अशा रीतीनें बराच वेळ गेला. पण साधू तें दूध पिईना. दूध गरम असेल म्हणून तें पिण्याजोगें थंड झाल्यावर तरी साधू तें पिईल असें तिला वाटलें. पण पुढें थोड्या वेळानें दूध न पितांच साधू जाऊं लागला. तेव्हां ती साधूला म्हणाली "महाराज, दूध न पितां आपण कां जातां ?" त्यावर तो साधू उत्तरला, " माई, साधूनें स्पर्श करण्याला हें दूध लायक नाहीं. "

यावर तिनें प्रश्न केला, "महाराज, असें कां बरें ?"

त्यावर साधू म्हणाला ' माई, तूं भांड्यांतून प्याल्यांत दूध ओतिलेंस. त्यांत तूं साखरपण घातलीस. तथापि आंत मलई पडली. तिच्यासह दूध देण्याची तुझी इच्छा नव्हती. म्हणून मलई पडतांच 'अगबाई' असे अनिच्छेचे उद्गार तूं काढिलेस. यामुळें मनापासून पूर्ण मोकळ्या भावनेनें न दिलेलें हें दूध माझ्या सारख्यानें घेणें योग्य नाहीं." असें सांगून तो साधू पुढें निघून गेला. तें ऐकून त्या बाईनें मान खालीं घातली व साधूनें आपले ते शब्द कसे जाणिले, त्याचेंहि तिला आश्चर्य वाटलें !

**बोध :** सारांश, **कोणाला कांहींहि देतांना तें चांगलें व मोकळ्या मनानें द्या.**

## २ : मला न कळत लोककल्याण व्हावें

फार फार जुन्या काळची गोष्ट. अगदीं साध्या रहाणीचा, नेहमीं क्षमाशील वृत्तीचा एक गृहस्थ होता. आपल्याजवळ असेल तर तें माग-तांच दुसऱ्याला मोकळ्या व उदार मनानें देणें हीच त्याची वागणूक. तो कधींहि कोणावर रागवत नसे. तो कोणाजवळून कांहीं घ्यावें अशी अपेक्षा

करीत नसे किंवा कोणाचा द्वेष करीत नसे. यामुळें सर्व लोक त्याला " साधू " म्हणत.

अशी त्याची रहाणी पाहून एकदां देवदूत ईश्वराजवळ जाऊन म्हणाले, ' प्रभो, त्या साधूला कांहीं सिद्धि वश होतील असें करा.' ही देवदूताची प्रार्थना ऐकून ईश्वर म्हणाला ' तुम्ही वेडे अहां. त्या साधूला तुम्ही म्हणतां तें कांहीं नको आहे. तो पूर्णपणें निरीच्छ आहे. तथापि तुमच्या इच्छे-प्रमाणें त्या साधूला कोणत्या सिद्धि प्राप्त व्हाव्या तें त्याला विचारून मला सांगा."

त्याप्रमाणें देवदूत साधूजवळ येऊन म्हणाले " साधो, आम्ही तुजवर प्रसन्न झालों आहों, तुला पाहिजे असेल तें माग. म्हणजे ईश्वराजवळून तें आम्हीं तुला देववितों. आजारी माणसास तुझा स्पर्श होतांच तो तात्काळ बरा व्हावा असा वर तुला पाहिजे का ? "

साधू म्हणाला. " छे ! तें तर ईश्वराचें काम आहे. तें त्याचें त्यानेंच करावें. त्यांत मी ढवळाढवळ करूं इच्छित नाहीं. "

" बरें तें राहो. पतित आत्म्यांना स्पर्श केल्याबरोबर त्यांचा उद्धार व्हावा. ही सिद्धि तुला पाहिजे का ? "

" छे ! तें देवदूताचें काम आहे व तें आपण करावें अशी इच्छा मला कधींच होऊं नये. असें माझें मागणें आहे. "

" बरें तर. आपण क्षमाशीलतेचे मूर्तिमंत पुतळे बनावें. व जनाचीं मनें आपल्याकडे आकर्षण करून घेऊन तेणें करून ईश्वराचें वैभव वाढवावें, अशी तरी तुझी इच्छा आहे का ? "

" छे ! छे ! " साधु म्हणाला " लोकांचीं मनें मी आपल्याकडे आक-र्षण करून घेऊं लागलों, तर तीं ईश्वरापासून विभक्त होतील. ही गोष्ट सर्वथा अयोग्य आहे. ईश्वराचें वैभव वाढविणारा मी कोण आहे. ईश्वराचें वैभव वाढविण्याला इतर शेंकडों साधनें आहेत. "

यावर देवदूतानें प्रश्न केला. "तर मग तुझी इच्छा तरी काय ?"

"मला इच्छा करण्याला काय आहे ?" किंचित् स्मितहास्य करून साधूनें उत्तर दिलें. "माझ्यावर ईश्वराची कृपा आहे. याच्या पलीकडे ईश्वराजवळ मागण्यासारखें दुसरें काय आहे ?"

यावर देवदूत उत्तरले, "तें कांहींही असो, निदान आमची इच्छा म्हणून तरी तूं एखादा वर माग. तूं न मागितल्यास तुझ्यावर एखादा वर लादल्याशिवाय आम्ही रहाणार नाहीं."

"मर्जी तुमची. तुम्ही कांहीं देणारच म्हणतां तर हे देवदूतांनो ! मला इतकेंच द्या कीं, मला न कळत माझ्या हातून जगाचें कल्याण व्हावें."

साधूच्या या भाषणानें देवदूत गोंधळून गेले. त्यांनीं आपसांत खलबत केलें व अखेरीस त्या साधूला असा वर देवविण्याचें ठरविलें कीं, "तो जिकडे जाईल तिकडे त्याच्या केवळ छायेमुळें आसपासच्या लोकांचीं दुःखें, क्लेश, यातना आणि रोगराई हीं निवारण व्हावीं."

देवदूतांनीं हा वर साधूला देवविला व त्याप्रमाणें त्याचा प्रभाव सर्वत्र दिसूं लागला. तो असा : साधू अरण्यांतून जाऊं लागला म्हणजे रानांतील शुष्क व वठलेला प्रदेश हिरवागार दिसूं लागे; वृक्ष व लता पुष्पित होऊं लागत; आणि निर्जल ओढ्यांना पाण्याचा पूर येऊं लागे; तो साधू शहरांत फिरूं लागला म्हणजे वाटेंतील मुलांचे सुकलेले चेहेरे टवटवीत व प्रफुल्ल होऊं लागत; आणि दुःखी कष्टी स्त्रियांचीं दुःखें नाहींशीं होऊन त्यांना परम हर्ष होई; पण एवढें हें कार्य आपल्यामुळेंच होत आहे, किंवा आपल्यामध्यें कांहीं अद्भुत शक्ति आहे. याचें त्याला मुळींच भान नसे. त्याच्या ठिकाणची विलक्षण नम्रता पाहून लोकांना आश्चर्य वाटे व तो चालूं लागला कीं, लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्याच्या मागून चालूं लागत. पुढें पुढें तर साधूच्या हालचालीमुळें इतके लोकोत्तर चमत्कार घडून येऊं

लागले कीं, त्या साधूचें मुळचें नांव विसरून लोक त्याला पुढें " पवित्र छाया " या नांवानेंच ओळखूं लागले.

बोध : **परमेश्वराची भक्ति करतांना तिच्या मोबदल्याची अपेक्षा करूंच नये.** जर कांहीं केलीच तर " बा परमेश्वरा, तुला जें काय मजसाठीं द्यावें वा करावेसें वाटेल तर तें तुझ्या इच्छेला येईल तेंच कर. " अशा वृत्तीनें वागावें.

## ३ : तालीमबाज व न्हावी

एक तालीमबाज होता. पण स्वतःच्या ताकदीविषयी त्याची अगदीं खोटी समजूत होती. ती अशी : त्याचा जन्म ज्योतिषशास्त्राप्रमाणें 'सिंह' या लग्नावर झालेला होता. या एकाच गोष्टीमुळें आपण सिंहासारखे शूर व पराक्रमी आहों, असें त्याला वाटे. तें लोकांना पटावें म्हणून त्यानें आपल्या दंडावर सिंहाची आकृति गोंदून घेण्याचा निश्चय केला आणि त्याप्रमाणें गोंदारी न्हाव्याला बोलावून आपला हेतु सांगितला. न्हाव्यानें गोंदण्याची तयारी केली व सुईनें सिंहाची आकृति काढण्यास प्रारंभ केला. सुईच्या टोचण्यानें तालीमबाजाच्या दंडाला वेदना होऊं लागल्या. त्याची त्रेधा उडाली व त्याची शौर्याची रग आंतल्या आंत जिरली. पण आपल्या दंडाला कळ लागली असें न्हाव्याजवळ स्पष्टपणें कबूल करावें तर आपली फजिती होईल असें वाटून तो त्या न्हाव्याला म्हणाला, ' न्हावी दादा ! तूं हें चालवलेंस तरी काय ? '

न्हाव्यानें उत्तर दिलें, " काय म्हणजे ? महाराज आपण सांगितल्याप्रमाणें सिंहाचें चित्र मी आपल्या दंडावर गोंदीत आहे, व त्याप्रमाणें सिंहाची शेंपटी काढण्याला सुरुवात केली आहे. "

तालीमबाज मोठ्या युक्तीनें बोलूं लागला. "न्हावीदादा! तें सगळें खरें; पण जगांतील हौशी लोक आपल्या कुत्र्यांची आणि घोड्यांची शेपटी कापतात, हें तुला माहीत नाहीं वाटतें? शेपटी कापल्यानें कुत्रे व घोडे मोठे शूर निपजतात; सिंहाचीच शेपटी कापली म्हणजे तो मोठा पराक्रमी बनतो. म्हणून, सिंहाची शेपटी उगाच काढतोस कशाला? छे! शेपटीची मुळींच जरूर नाहीं."

न्हावी बिचारा काय करणार? तो म्हणाला, "महाराज, आपण सांगाल त्याप्रमाणें करण्याला माझी कोठें ना आहे? शेपटी नको म्हणतां ठीक आहे! शेपटी सोडून मी आतां सिंहाच्या शरीराचे बाकीचे अवयव गोंदतों." असें म्हणून न्हावीदादानें सुई पुनः हातीं घेतली. व त्याच्या दंडाला लाविली. परंतु आतां त्या गर्विष्ठ तालीमबाजाला सुईचा स्पर्श-देखील सोसवेना! तो एकदम न्हाव्याच्या आंगावर खेकसून म्हणाला, "अरे, हें तूं आतां मांडलें आहेस तरी काय?

न्हाव्यानें उत्तर दिलें, 'काय म्हणजे मी आतां सिंहाचे कान गोंदतों आहे."

त्यावर तो तालीमबाज पुनः म्हणाला, "न्हावी दादा, तूं खरोखरच मूर्ख आहेस. अरे, मोठे लोक आपल्या कुत्र्यांचे कान कापतात हें सुद्धां तुला माहीत असूं नये ना? असले कान कापलेले कुत्रे फारच चांगले निपज-तात. कुत्र्याप्रमाणें सिंहाचे कान कापले तर त्याच्या शूरपणांत कितीतरी भर पडेल."

यजमानांची स्वारी खूप गरम झालेली पाहून न्हावी दादानें कान गोंद-ण्याचें काम सोडून दिलें; व थोडावेळ जाऊं देऊन पुन्हां आपलें शस्त्र उचललें; व तें तालीमबाजाच्या दंडास लावण्यास पुनः सुरुवात केली. तें पाहून यजमानांची स्वारी पुनः संतापून म्हणाली, "अरे, पुनः हें काय चालविलें आहेस?"

न्हावी म्हणाला, "महाराज, मी सिंहाचे कान सोडून दिले! आतां मी सिंहाची कंबर गोंदीत आहे."

यजमान म्हणाले, "न्हावी दादा, तूं खरोखरच गचाळ आहेस! तूं काव्य वगैरे पढला नाहींस असें दिसतें! आपल्या प्राचीन कवींनीं सिंहाची कटि कशी असते, याचें वर्णन किती छान केलें आहे. सिंहकटि इतकी बारीक असली पाहिजे कीं, ती दिसते आहे कीं, नाहीं, असा पहाणाराला भ्रम पडावा! म्हणून म्हणतों सिंहकटी गोंदण्याच्या भानगडींतच तूं पडूं नको."

न्हावी दादानें यजमानाच्या भाषणाचा रोख ओळखला; त्यांच्या शौर्याचें पाणीहि जोखलें व त्यांना रामराम करून तो मुकाट्यानें निघून गेला!

**बोध : खोटी बढाई मारूं नये.** सत्याकरितां फार कष्ट सोसावे लागतात **ईश्वर साक्षात्कार प्राप्त करूं पाहणाऱ्या लोकांनीं त्यासाठीं लागणारी किंमत देण्यास तयार असलें पाहिजे.**

## ४ : सोन्याच्या विटांचा मोह

ग्रीक दंतकथेंतील गोष्ट. ॲटलांटा नांवाची एक रूपवान स्त्री धांवण्याच्या कामांत अति चपळ असे. जो कोणी आपल्याला धांवण्याच्या शर्यतींत जिंकील त्याची मी पत्नी होईन असें तिनें जाहीर केलें.

त्याप्रमाणें अनेक तरुणांनीं प्रयत्न केले. पण व्यर्थ! कोणीहि तिला धावण्याच्या शर्यतींत जिंकूं शकला नाहीं. तिनें एका देवतेला प्रसन्न करून "धांवण्याच्या व शक्तीच्या कामांत अजिंक्य होईन" असा वर मागून घेतला होता.

पण हिपोमॅनिस नांवाच्या माणसानें 'ॲफ्रोडाइट' नांवाच्या देवतेला प्रसन्न करून घेतलें. त्या देवतेनें असें सांगितलें कीं "ॲटलांटा अत्यंत लोभी आहे. यासाठीं धांवण्याच्या शर्यतीच्या मार्गावर युक्तीनें सोन्याच्या विटा टाक म्हणजे तूं तिला जिंकशील."

हें तिचें वर्म माहीत झाल्यामुळें हिपोमॅनिस यानें त्या मार्गावर सोन्याच्या विटा टाकिल्या आणि ॲटलांटा हिला शर्यतीचें आव्हान दिलें व तें तिनें स्वीकारिलें.

शर्यतीला सुरवात होऊन तीं दोघे धावूं लागलीं. थोड्याच वेळांत ती त्याच्यापुढें धांवून गेली पण थोडें अंतर धांवून गेल्यानंतर मार्गावर सोन्याच्या विटा पसरलेल्या तिच्या दृष्टीस पडल्या. स्त्रीजात व सोनें यांचें नातें तुम्हांला माहीतच आहे. त्या सोन्याच्या विटा पहातांच तिला मोह उपलब्ध झाला व त्या विटा गोळा करण्याला तिनें प्रारंभ केला. त्य कामांत ती गुंतली असतां हिपोमॅनिस तिला मागें टाकून पुढें गेला !

हें पहातांच ॲटलांटा जोरानें धावूं लागली व थोड्याच वेळांत हिपोमॅनिसच्या पुढें गेली पण पुढें जाऊन पहाते तों मार्गांत आणखी सोन्याच्या विटा पसरलेल्या पाहिल्या म्हणून तिनें त्या गोळा करण्यास सुरवात केली. या संधीचा फायदा घेऊन तो पुनः तिच्या पुढें गेला. अशा रीतीनें धांवण्याचा व विटा गोळा करण्याचा क्रम सुरू होता. तितक्या वेळांत ॲटलांटा हिच्यापाशीं सोन्याच्या विटांचें एक भलें मोठें ओझें जमा झालें.

तें ओझें घेऊन शर्यतींत पुढें धांवणें हें तिला अधिकाधिक जड जाऊं लागलें. त्यामुळें तिची गति अधिकाधिक मंद होत गेली. ही सोन्याची संधि हिपोमॅनिसला मिळाल्यामुळें शर्यतीच्या अखेरीस त्यानें तिला मागें टाकिलें व शर्यत जिंकली !

शर्यतीच्या अटीप्रमाणें ॲटलांटा हरली व ती त्याची त्याची पत्नी

झाली. यामुळें हिपोमॅनिसला ॲटलांटा तर मिळालीच पण तिनें गोळा केलेल्या सोन्याच्या विटाही त्याच्या झाल्या !

**बोध** : आपले ध्येय गांठावयाचें असेल तर कोणत्याहि मोहाला तें गांठीपर्यंत बळी पडूं नका. आत्मानुभव घेतांना वैषयिक जीवनाचे अनेक मोह उत्पन्न होतात, त्यावेळीं त्यांना बळी पडूं नका. मोह आवरा व ध्येय गांठा म्हणजे मग सर्वच आपलें आहे ध्यानांत ठेवा. परमार्थाच्या मार्गांत जेव्हां पिता आड आला तेव्हां **प्रल्हादानें** सर्व सोसूनहि पित्याचा नाद सोडिला. परमार्थाच्या मार्गांत जेव्हां माता आड आली तेव्हां **भरतानें** तिचें न ऐकतां ध्येय गांठिलें. रावण चुकतो आहे, तो आपलें ऐकत नाहीं असें पाहून **विभीषणानें** त्याचा त्याग केला. राजा **भर्तृहरीची** पत्नी जेव्हां परमार्थाच्या मार्गांत आड आली तेव्हां भर्तृहरीनें तिचा त्याग केला. पति आपल्या परमार्थाच्या मार्गांत आड येतो आहे असें पहातांच **मीराबाई** आपलें पत्नीत्वाचें नातें पार विसरून गेली.

भीष्मानें आपल्या ज्ञानदात्या गुरूचेंहि ऐकिलें नाहीं. सारांश, व्यावहारिक असो वा परमार्थिक असो, ज्या गोष्टी आपल्या ध्येयाच्या आड येत असतील **त्यांचा मोह आवरा व आपलें ध्येय गांठीपर्यंत त्या सर्वांना न दुखवितां व ओळखून बाजूला सारा; पण ध्येय गांठा.**

## ५ : बहुरूप्यांचा सिंह

एके काळीं कांहीं बहुरूपी एका बादशहाकडे गेले व आपल्याला उत्कृष्ट सोंगे आणितां येतात अशी तारीफ करूं लागले. बादशहानेंहि त्यांची परीक्षा घेण्याच्या इरादानें त्यांची विनंति मान्य करून त्यांच्या खेळाकरितां एक दिवस नेमून दिला.

त्याप्रमाणें पहिल्या दिवशीं बहुरुप्यांचीं सोंगें पाहून बादशहा खूप झाला. एवढेंच नव्हे तर अशा तऱ्हेचीं निरनिराळी सोंगें आणण्याविषयीं बादशहानें त्यांना पुन्हां हुकूम केला. त्याप्रमाणें त्या बहुरुप्यांनीं नवनवीन सोंगें आणून बादशहाला फार खूष केलें. असा सोंगें आणण्याचा क्रम बरेच दिवस चालू होता. अशा रीतीनें या धंद्यावर त्यांना बरीच बिदागी मिळाली हें खरें.

परंतु लवकरच बादशहाचे डोळे उघडले ! व बहुरुप्यांना यत्किंचित सोंगासाठीं आपण हजारों रुपये दिले, याबद्दल फार पश्चात्ताप झाला. एवढें वाटतांच ते पैसे बहुरुप्यांकडून परत काढण्याची त्यानें एक युक्ति योजिली. ती अशी :

त्यानें त्या बहुरुप्यांना बोलावून आणिलें व सिंहाचें सोंग आणण्यास सांगितलें; पण अट ही कीं, "तुम्हांला सिंहाची वतावणी चांगली करितां आली तर हजारों रुपये बिदागी मिळेल; पण जर का सिंहाची वतावणी चांगली झाली नाहीं तर मात्र तुमची आतांपर्यंतची सर्व मालमत्ता जप्त केली जाईल."

विचारे बहुरूपी संकटांत पडले; प्रथम त्यांनीं सिंहाच्या भूमिकेचे खासगी प्रयत्न करून आपली शिकस्त केली. पण त्यांचें त्यांनाच तें चांगलें असल्याचें पटेना. यामुळें ते बिचारे अधिकच चिंताग्रस्त झाले. अशा विवंचनेंत असतां त्यांची एका सत्पुरुषाची गांठ पडली. ते त्याला शरण गेले व आपल्यावरील संकट टाळण्यासाठीं त्याची त्यांनीं प्रार्थना केली.

त्या विश्वप्रेमी सत्पुरुषाला बहुरुप्यांची कींव आली. त्यानें त्यांना धीर दिला कीं, "मीच स्वतः सिंहाचें सोंग आणण्यास तयार आहें" एवढा धीर त्या बहुरुप्यांना मिळतांच ते बादशहाकडे गेले व आपण सिंहाचें सोंग आणण्यास तयार असल्याची वर्दी बादशहाला दिली.

लगेच दुसऱ्या दिवशीं सिंहाचें सोंग पहाण्यासाठीं मोठा दरबार भर-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नोंद दि. ...



विण्यांत आला. सर्व दरबारी लोक सिंहाचें सोंग केव्हां एकदां येतें व आम्ही तें पहातों अशा उत्सुकतेनें मार्गप्रतीक्षा करीत बसले होते. इतक्यांत एक प्रचंड सिंह मोठी गर्जना करून दरबारांत येऊन थडकला. त्यानें इकडे तिकडे पाहिले. गर्जना ऐकून लोकांना तो खरा सिंह तर नव्हे ना? असें वाटलें. पण, तें सोंग आहे असें माहीत असल्यानें कोणीच घाबरले नाहींत.

इतक्यांत त्या सिंहानें बादशहाच्या शेजारीं बसलेला राजपुत्र पाहिला, त्याच्याजवळ तो सिंह गेला. त्यानें त्या राजपुत्राला खालीं ओढिलें आणि त्याला फाडून त्याचे तुकडे तुकडे केले! एवढेंच नव्हे तर दरबारांतील एका मुलीची पण त्यानें अशीच वाट लाविली. झालें! सिंहाच्या सोंगाची वतावणी तर उत्तम झाली; पण ठरल्याप्रमाणें त्या बहुरूप्यांना मोठी बिदागी तर मिळालीच. तथापि बहुरुपीही फार घाबरले. पण पैसे परत उकळण्याचा बादशहाचा डाव तर फसलाच व उलट राजपुत्र गमवावा लागला. म्हणून बादशहा व दरबारी लोक वेषधारी सिंहाच्या क्रूर कृत्यानें तर फार चिडून गेले. व चौकशीअंतीं असें समजलें कीं, तो वेषधारी सिंह तिसरा कोणी नसून तो साधूच खरा सिंह बनला होता. म्हणून या त्याच्या दुष्कृत्याचा सूड घेण्याचें लोकांनीं ठरविलें.

ते त्या साधूजवळ येऊन त्याला म्हणाले, "सांईजी, राजपुत्राला जिवंत करा. ज्याच्या अंगामध्यें राजपुत्राला ठार मारण्याचें सामर्थ्य आहे, त्याच्यामध्यें त्याला फिरून जिवंत करण्याचेंहि सामर्थ्य असलेंच पाहिजे. 'बिस्मिल्ला' हे शब्द उच्चारून महंमद ज्याप्रमाणें मृतांना सजीव करीत असे, त्याप्रमाणें तुम्ही या राजपुत्राला जिवंत करा. नाहीं तर तुम्हांला राजपुत्राच्या खुनाबद्दल मोठें प्रायश्चित भोगावें लागेल!"

हें त्यांचें बोलणें ऐकून त्या साधुला फार हसूं आलें. 'बरें तर' असें म्हणून तो साधू त्या मृत राजपुत्राला उद्देशून म्हणाला 'हे राजपुत्रा!

देवाचें नांव घेऊन मी तुला हांक मारीत आहें; तर पुन: जिवंत हो." परंतु तेवढ्यानें राजपुत्र जिवंत झाला नाहीं. तेव्हां दरबारी लोकांना तो म्हणाला, "देवाचें नांव घेऊन मी राजपुत्राला हांक मारीत आहें. परंतु इतक्यानें तो जिवंत होत नाहीं."

त्यानें पुन: एकदां देवाचें नांव घेऊन राजपुत्राला हांक मारिली; परंतु त्याचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. नंतर किंचित् स्मित हास्य करून साधु म्हणाला, "कुम् बिझिनी". याचा अर्थ असा कीं, मी तुला हुकूम करीत आहे, कीं तूं पुन: जिवंत हो. साधूनें ते शब्द उच्चारिल्या बरोबर राजपुत्र जिवंत झाला. हें पाहून दरबारी लोकांना फार आनंद तर झालाच; पण त्या साधूबद्दल फार आश्चर्य वाटलें. त्या साधूनें इतक्या उच्च कोटीचें सामर्थ्य प्राप्त करून घेतलें होतें, तरीहि कांहीं दुष्ट व पाखांडी (नास्तिक) लोकांनीं त्या साधूला ठार मारण्याचा बेत केला तो असा कीं, त्याच्या अंगाचें कातडें सोलून त्याला ठार मारावयाचा. हे विचार त्या साधूला समजतांच, त्यानें आपल्याच नखांनीं पशूचें कातडें सोलितात, त्याप्रमाणें आपलें सर्व चामडें सोलून काढून फेकून दिलें !! त्यावेळीं त्या साधूनें पुढील आशयाचे उद्गार काढले.

"हें जग म्हणजे निव्वळ कुजलेलें शव आहे, आणि विषयसुख (देहांतील खरें सामर्थ्यवान् परमात्म स्वरूप न ओळखणें) ही या शवाची दुर्गंधी आहे. असल्या दुर्गंधीच्या मागें लागणारे लोक म्हणजे केवळ श्वान होत. यासाठीं या कुत्र्यांना हें मांस खुशाल भक्षण करूं द्या." या साधूचें नांव **शम्स तब्रेज** असें होतें.*

---

* हा आत्मज्ञानी साधू उत्कृष्ट कवी असून तो इराणमधील होता. त्याच्या उत्कृष्ट काव्याचें नांव 'दीवान-ए-शम्स तब्रेज' असें आहे. पंजाबांतील मुल्तान शहराजवळ त्याची कबर दाखविली जाते. तो इ. स. १२६७ साली पैगंबरवासी झाला. हा ख्रिस्तापेक्षांहि मोठ्या योग्यतेचा होता.

**बोध :** त्या सत्पुरुषाच्या ठिकाणीं परमात्मभाव इतका दृढ होता कीं, आपण सिंहाचा वेष घेऊन खरा सिंह बनावें असें मनांत येतांच तो वृत्तीनें खरा सिंह बनला. व याच्या उलट देह म्हणजे मी नव्हे ही वृत्ति पूर्णतः बाणली असल्यानें लगेच त्यानें आपल्या अंगाचें कातडेंही सोडून दिलें.

सारांश, जशी पक्की ( नाटकी नव्हे ) दृढ भावना कराल तसे तुम्हीं होऊं शकतां. 'मीच परमेश्वर आहे' 'अनल हक' असेच शब्द याच साधूच्या बापाच्या तोंडांतूनच नव्हे तर रोमारोमांतून त्याला सुळावर चढवला, तेव्हां निघत होते, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

# ६ : घोडा व सांबर

एकदां एक घोडा व सांबर ह्यांची झुंज लागली. बराच वेळ झुंज चालली व अखेरीस त्यांत घोड्याचा पराभव झाला. घोड्याला वाईट वाटून सांबराचा कोणत्या तरी युक्तीनें पराभव केलाच पाहिजे असें मनांत येऊन तो माणसाला शरण गेला. उत्क्रांतीच्या प्रथमावस्थेंत माणूसहि जंगलांत रहात असे. त्यामुळें माणसानें घोड्याला मदत करण्याचें कबूल केलें.

मनुष्य घोड्याला म्हणाला, "माझ्या हातांत धनुष्यबाण आहे. तूं आपल्या पाठीवर मला वाहून ने म्हणजे मी सांबराचा नाश करितों."

घोड्याला ती गोष्ट पटली. त्याबरोबर मनुष्य घोड्यावर स्वार झाला. घोड्यानें त्याला वाहून जंगलांत नेलें व लगेच माणसानें त्या सांबराल बाणानें ठार केलें.

घोडा व माणूस हे दोघेहि परत आले. सांबरावर विजय मिळविल्यामुळें घोड्याला मोठा आनंद झाला. आणि प्रसंगीं मदत केल्यामुळें घोड्यानें माणसाचे फार आभार मानिले. आणि "येतों" असें सांगून घोडा जाऊं लागला.

त्यावर लगेच त्याच्या पाठीवर हात थोपटून मनुष्य म्हणाला, "बाबा तूं जातोस कोठें? तूं किती उपयोगी आहेस हें आतां मला चांगलेंच समजलें आहे. म्हणून मी तुला कसा जाऊं देईन? तुला आतां माझ्यासाठीं राबलेंच पाहिजे!

तात्पर्य, घोड्याला आतां जरी सांबर, हरिण किंवा इतर पशू ह्यांची भीति राहिली नाहीं, तरी त्याला त्याकरितां स्वतःचें स्वातंत्र्य कायमचें गमवावें लागलें!

**बोध :** दिखाऊ विजयाकरितां घोड्याला कायमचें दास्य पत्करावे लागलें. विवाहित पुरुषाची स्थिति घोड्यासारखी होते. स्त्री पुरुषाला अनेक मोहांपासून बचाविते हें जरी खरें, तरी **पुरुषाला स्त्रीरूपी एका प्रबळ मोहाच्या अंकित व्हावें लागतें!**

## ७ : सज्जन धन्याचा नाठाळ नोकर

एका सद्गृहस्थाकडे एक खट्याळ नोकर होता. धनी सांगेल त्याच्या उलट वागावयाचें असा त्याचा क्रम असे. त्याची वागणूक इतकी चमत्कारिक व तऱ्हेवाइक असे कीं, मूर्तिमंत शांतीनेंसुद्धां त्याच्यापुढें हात टेकले असते! पण धनी फार विचारी होता. नोकराच्या द्वाडपणामुळें त्याची शांति कधींहि ढळत नसे. तो त्या नोकराला मोठ्या प्रेमानें व आदरानें वागवी.

एकदां एका पाहुण्याला नोकराच्या तऱ्हेवाइक वर्तनाचा फार संताप आला. 'आतांच्या आतां याला हांकलून द्या.' अशी तक्रार त्यानें यजमानाजवळ केली. त्यावर धनी अगदीं शांतपणें म्हणाला, "मित्रा, तूं म्हणतोस तें बरोबर आहे. काम नीट व वेळच्या वेळीं व्हावें, व तेणें-करून माझी भरभराट व्हावी, ह्या सद्धेतूनेंच तूं हा सल्ला देत आहेस हें पण मी जाणतों. नोकराच्या विक्षिप्तपणामुळें माझें वारंवार नुकसान होतें हें मी पूर्णपणें जाणतों. परंतु याच कारणामुळें मी त्याला ठेवून घेतला आहे. त्याच्या आंगचा खोडसाळपणा व दुष्टपणा यामुळेंच तो मला आवडतो, त्याची कींव येते व म्हणून मी त्याच्यावर लोभ करितों."

मित्राचा हा चमत्कारिक खुलासा ऐकून पाहुण्याला फार आश्चर्य वाटलें. त्यावर पुनः धनी म्हणाला, "धंद्याच्या वा अन्य कारणानें बऱ्याच लोकांशीं माझा संबंध येतो, परंतु माझ्या सांगण्याबाहेर कोणीच वागत नाहीं. पण हा नोकर मात्र अगदीं उलट वागतो. त्याचें प्रत्येक कृत्य माझ्या लौकिकाला न साजेसें, अपमानास्पद व हानिकारक असतें. संबंध येणारा प्रत्येक माणूस माझ्याशीं मोठ्या प्रेमानें, मोकळ्या मनानें व सभ्य रीतीनें वागतो. पण हा नोकर मात्र माझें कधींच ऐकत नाहीं. म्हणून हा कोणी तरी असामान्य कोटींतील माणूस असला पाहिजे. हें उघड नाहीं का ? मित्रा, आपण शारीरिक सामर्थ्य वाढविण्याकरितां मुद्‌गल फिरवितों, मोठमोठी वजनें उचलितों, निरनिराळ्या कसरती करितो, त्याप्रमाणें आध्यत्मिक सामर्थ्य वाढविण्यासाठीं, आपणांस शमदमादि कसरतींची जरूर आहे. व म्हणून या नोकराला मी आध्यात्मिक व्यायायाचे मुष्टि-मोदकच समजतों! याच्या सहवासानें माझें आध्यात्मिक सामर्थ्य रोजच्या रोज वाढत आहे. कारण त्याच्याशीं नित्यनियमानें मला दोन दोन हात करावेच लागताच ! म्हणून मी त्याला माझ्या आत्मसंयमनाची

शाळाच समजतों ! ! " तुकाराम महाराज याच हेतूनें " निंदकाचें घर असावें शेजारीं " असें म्हणत.

**बोध :** मनावर हुकमत चालविण्यासाठीं त्यावर ताबा मिळविणें जरूर आहे. त्यासाठीं प्रपंचांत तसेंच आपल्या ध्येयाकडे जात असतांना येणाऱ्या अडचणींकडे वरील दयाळू धन्याच्या दृष्टिकोनांतून पहा. तरचं तुम्ही मनावर ताबा मिळवाल. आणि एकदां कां **मनावर ताबा मिळाला म्हणजे तुम्ही हवी ती गोष्ट निश्चयानें करून त्यांत यश मिळवाल.**

## ८ : वृंदावनांतील गोपाळकृष्ण

एकदां एक वृद्ध स्त्री एका साधूकडे गेली व हात जोडून त्याला म्हणाली, " महाराज ! या देहाचे सार्थक करावें अशी इच्छा आहे. मुलें-बाळें, घरदार, वतनवाडी सर्व कांहीं सोडून श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाल-लीलांनीं पुनित झालेल्या वृंदावनांत जाऊन रहावें असें माझ्या मनांत येतें. सर्व प्रेमपाश तोडून वृंदावनांत जाऊन रहाणें परमार्थसाधनाला आवश्यकच आहे का ? प्रपंचांत राहून परमार्थ नाहीं का साधितां येणार ? "

साधूच्या दर्शनाला जातांना बाईनें आपल्या नातवाला बरोबर नेलें होतें. बाईचें भाषण ऐकून तो साधु म्हणाला, ' बाई ! तुमच्या या नात-वाच्या डोळ्यांच्या द्वारें तुमच्याकडे कोण बरें पहात आहे ? या मुलाच्या रोमरोमांत कोणती दिव्यशक्ति, कोणतें दिव्य तेज व्यापून राहिलें आहे ? मुलाच्या रूपानें कोणतें दिव्य तत्व तुमच्याकडे या क्षणीं पहात आहे ?"

बाईनें उत्तर केलें, " साक्षात् परब्रह्मच त्याच्या डोळ्यांवाटे मजकडे पहात असलं पाहिजे. कारण त्याच्या ठिकाणीं रागद्वेषाचा मागमूसही संभवत नाहीं. "

# १ : दोन जिवलग मित्र

## ( पत्र लिहून संपतांच मित्र समोर उभा )

दोन जिवलग मित्र होते. पण फार काळांत ते एकमेकांना भेटले नव्हते. म्हणून एकाला दुसऱ्याच्या भेटीची फार तळमळ लागली होती. तो केव्हां भेटेल असें त्याला झालें ! पण तो कांहीं भेटलाच नाहीं, तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं, आपण त्याला पत्र लिहावें व त्यांत आपल्या मनांत जे जे विचार येतात, ज्या ज्या आठवणी येतात, जे जे प्रसंग, व ज्या ज्या गोष्टी आठवतात, त्या सर्व त्याला लिहून कळवाव्या म्हणजे तरी तो येऊन भेटेल. ह्या इच्छेनें तो त्याला पत्र लिहूं लागला.

पत्र लिहितांना तो इतका तन्मय होऊन गेला कीं, पानामागून पानें तो लिहितच गेला, प्रत्येक गोष्टीशीं व प्रसंगाशीं तो इतका समरस होऊन होऊन गेला कीं, मनांतील होते नव्हते ते सर्व विचार लिहून संपेपर्यंत त्यानें क्षणभर वर देखील पाहिलें नाहीं किंवा हाताला विसावा दिला नाहीं; अखेरीस त्याच्या मनांतील विचार व आठवणी संपल्या मन इच्छा--पूर्ण झालें. एवढेंच नव्हे, तर मित्राच्या भेटीची इच्छाहि मावळली ! तेव्हां कोठें त्यानें एक उसासा टाकिला व लगेच वर पाहिलें. तो काय चमत्कार झाला कीं तो ज्याची आठवण करीत होता, ज्याच्या भेटीची त्याला तीव्र तळमळ लागली होती, तो मित्रच त्याच्यापुढें प्रत्यक्ष उभा राहिलेला होता.

हें दृश्य पहाताच तो ताडकन् उठला व त्याला कडाडून मिठी मारली. थोडा वेळ तसाच राहून मग उद्गारला कीं मी, तुझी किती किती आठवण करितों, तुला केव्हां भेटेन असें मला झालें. इत्यादि विचार व मनाची तळमळ त्यानें त्याला सांगितली व मग तूं केव्हां आलास ? किती वेळ झाला, कसा आलास इत्यादि गोष्टींची त्यानें विचारपूस केली.

त्यावर तो मित्र उत्तरला कीं मला येथें येऊन अर्धा तास झाला, तूं लिहिण्यांत इतका गर्क होऊन गेला होतास कीं, त्यांत तुला अडथळा आणावा किंवा तुला भानावर आणावा हें मला बरें वाटलें नाहीं, म्हणून मी तसाच उभा राहिलों."

सारांश, त्याच्या मनाची तळमळ पत्रांतील अक्षरांनीं शांत झाली, व भेटीची इच्छा तृप्त झाली. ती इच्छा त्याच्या मनांतून पार निघून गेली तेव्हां कोठें त्याचें काम झालें! त्याचा जिवलग त्याला भेटला! त्या भेटीच्या विचारांच्या लहरी त्या दुसऱ्या मित्रांच्या मनाला जाऊन भिडल्या, त्याच्या अंतःकरणावर जाऊन आदळल्या व त्यामुळें तो मित्र त्याच्याकडे जाऊन त्याच्यापुढें उभा राहिला.

**बोध : इच्छा करण्याचेंच सोडाल, इच्छा करण्याचें थांबाल, तर त्या चटकन् पूर्ण झाल्याचें पहाल.**

## १० : सुखी होण्याचे उपाय

मोंगल राजवटींतील गोष्ट. सत्तेचा हव्यास केवढा मोठा असतो पहा! अतिरेकी महत्त्वाकांक्षा मनुष्याच्या मनांत केवढें मोठें दुष्ट कारस्थान उत्पन्न करिते व त्यामुळें किती अघोर कृत्य वा कृत्यें करण्यास मनुष्य प्रवृत्त होतो ह्या गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. शहाजहान बादशहानें आपल्या बापाला म्हणजे जहांगिराला त्याच्या अखेरच्या दिवसांत आपल्यालाच बादशाही—बादशहाची गादी—सत्ता मिळावी म्हणून कैदेंत टाकिलें व आपण सत्ता बळकावून बसला! तोच प्रसंग शहाजानच्या उतार वयांत त्याचा मुलगा औरंगजेब ह्यानें त्याच्यावर आणिला आणि बापाला कैदेंत टाकून आपण बादशहा बनला. औरंबजेब-

वरहि व त्याच्यानंतरच्या दोनतीन पिढ्यांत ही अशीच कृति घडल्याचें इतिहास सांगतो.

शहाजान यानें कैदेंत असतांना औरंगजेबाला एक पत्र पाठविलें कीं, " तूं मला कैदेंत तर टाकिलेंस; पण मला करमत नाहीं, माझा वेळ जाण्याला कांहीं साधन नाहीं. तरी असें कर कीं, कांहीं विद्यार्थी मजकडे पाठव. त्यांना शिकविण्यांत तरी माझा कांहीं वेळ जाईल व अशा रीतीनें माझ्या मनाला थोडें समाधान मिळून मी थोडा सुखी होईन. तरी एवढें काम तरी करशील ना ? "

" बाबा, आतां तुम्ही ह्या तुमच्या मुलाचें एवढें थोडें तरी ऐकाल का ? इतके वर्षेपर्यंत तुम्ही राज्य केलेंत. लोकांवर अधिकार गाजविण्याचें सुख घेतलेंत; पण इतक्या वर्षांनंतर तरी ती अधिकारपिपासा, लोकांवर अधिकार गाजविण्याची ती तुमची दुर्दम्य इच्छा, थोडी तरी कमी झाली का ? ह्याचा विचार करा. ती अधिकार गाजविण्याची महत्त्वाकांक्षा यत्किंचितही कमी झाली का ? नाहीं. याउलट अधिकारपिपासेची इतक्या वर्षांची ती सवय उसळून जोरानें पुढें येत आहे. म्हणून ' दुधाची तहान ताकावर' या न्यायानें तरी ती भागविण्यासाठीं, तुम्ही शिकविण्याच्या मिषानें विद्यार्थ्यांवर अधिकार गाजवूं पहात अहां. तुमची ती संवय जात नाहीं ' जुनें ठेवणें मीपणें तें गळेना ' हेंच खरें. अशी वस्तुस्थिति आहे. तरी विचार करा कीं, आम्हां तरुणांच्या मनांत उत्पन्न झालेली अधिकारोर्मि आम्हांला तरी कशी सोडितां येणार ? बाबा, तुमचें नांव ' शहाँ-इ-जहान् " म्हणजे अखिल विश्वाचे ( जहान् ) तुम्हीं राजे म्हणजे सार्वभौम बादशहा " असें असूनहि तुम्ही हलक्या महत्त्वाकांक्षेच्या पायीं आपलें मन दुःखित करीत आहां ! !

राम सांगतो, कीं विचार करा कीं, त्या जगत्स्वामीला ( शहाँ-इ-जहानला ) तुम्ही क्षुल्लक तृष्णारूपी पिंजऱ्यांत कोंडून ठेवित आहां.

देहरूपी 'ब्लॅक होल'*मध्यें, त्या क्षुद्र अहंकराच्या तृष्णोर्मीच्या 'क्वारंटाइन' मध्यें त्याला कोंडून टाकीत आहां. म्हणून तुमचें मन स्वस्थ व शांत नाहीं. चित्ताला समाधान वाटत नाहीं.

**बोध :** सारांश, तुम्हांला खरें मनःस्वास्थ्य प्राप्त व्हावें, त्यापासून खरें सुख मिळावें असें वाटत असेल तर **अमर्याद महत्त्वाकांक्षांना पूर्ण फांटा द्या.** व्यापक चिदात्म्याला संकुचित देहात्मभावाच्या कैदेंत कोंडून टाकू नका. म्हणजे तुम्ही पूर्ण सुखी व्हाल.

## ११ : एक स्त्री व तिचा फोटो

### ( भावी घटनांची छाया आगाऊ पडते )

एकदां एक स्त्री आपला फोटो काढून घेण्यासाठीं एका उत्कृष्ट फोटोग्राफरकडे गेली व तिनें आपला फोटो काढण्याची आपली इच्छा त्याला सांगितली.

लगेच तो फोटोग्राफर आपला कॅमेरा उघडून त्यांत उत्कृष्ट व निर्दोष अशी मुद्रिका घेणारी काच शोधून ती त्यानें त्या कॅमेऱ्यांत भरून 'फोटो' घेण्याची तयारी केली.

तयारी होतांच ती स्त्री मुद्रिकाभिंगासमोर गेली व तिची मुद्रिका घेण्यांत आली. काच धुवून मुद्रिका ऊर्फ चित्र किंवा फोटो कसा आला आहे हें तो पाहूं लागला. तेव्हां त्याला त्या कांचेवर त्या स्त्रीच्या

* 'ब्लॅकहोल'—ब्रिटिशांच्या राजवटीत कलकत्त्याला एका माणसाला पुरेशा तुरुंगाच्या कोठडींत शेकडों भारतीयांना कोंडून ठार मारण्यांत आलें. त्याला Black Hole of Calcutta असे इतिहासांत म्हणतात !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. बालमालय शाखा.
अनुक्रम... ०५९.९० ... वि. ...
क्रमांक... ३७०३ ... नोंद दि. २८/३/६९



चेहेऱ्यावर देवीचे व्रण दिसूं लागले ! हें कसें झालें ? हा काय दोष आहे ? असा फोटो कसा व कां यावा ? या विचारानें त्यानें दुसऱ्या नवीन कांचा भरून त्या स्त्रीचा पुनः फोटो घेतला ! पण त्या वेळीहि तोच प्रकार ! हें पाहून तो गोंधळून गेला. व तसें कां होतें हें कोडें त्याला व त्या स्त्रीलाहि उलगडेना ! म्हणून त्यानें पुनः येण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ती स्त्री घरीं आली व थोड्या वेळांतच तिला देवींचा ताप भरला व देवी आल्या !

हें पाहून ती पण चकित झाली व असें कां व्हावें याचा ती विचार करूं लागली. तो तिला नुकतेंच तिच्या बहिणीचें तिला देवी आल्याचें पत्र आलें होतें. त्याची तिला आठवण झाली. पण आपल्याला देवी कां याव्या तसेंच त्या येण्यापूर्वीही फोटोमध्यें देवींचे वण कां दिसावे हें कोडें तिला उलगडे ना.

विचार करून चौकशी केल्यावर तिला असें कळलें कीं, देवी आलेल्या बहिणीनें जें पत्र लिहून लिफाफ्यांत बंद केलें होतें तो लिफाफा तिनें आपल्या जिभेच्या ओलाव्यानें बंद करून तो पोस्टांत टाकिला व तो लिफाफा ह्या बहिणीनें आपल्या हातानें उघडून वाचिला व कांहीं वेळानें ती फोटो काढण्यासाठीं गेली !

विचार करा. तेवढ्या संसर्गानें पत्र फोडून वाचणाऱ्या बहिणीच्या अंतरिंद्रियांवर त्या देवींच्या सांथीचा परिणाम तात्काल झालेला होता; तथापि तो परिणाम तिच्या अंगावर व चेहेऱ्यावर उमटून दिसण्याला वेळ होता हें खरें. पण त्या फोटोग्राफरची ती काच इतकी त्वरित संस्कारक्षम होती कीं, त्या शक्तीमुळें त्या स्त्रीच्या अंतरिंद्रियावर झालेले परिणाम त्या काचेवर स्पष्ट उमटले.

**बोध :** मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात, यांत जो गर्भित ध्वन्यर्थ आहे. तसाच अर्थ ' भावी घटनांची पडछाया आगाऊच पडत असते

ह्या म्हणींत आहे. पण आपण त्याकडे लक्ष देत नाहीं, ध्यानांत घेत नाहीं. एवढेंच नव्हे तर त्यावर आपला तितका विचारी विश्वासहि नसतो हें जितकें खरें तितकेंच अशा संस्कारांचा परिणाम व्हावयाचा तो झाल्याशिवाय मात्र रहात नाहीं हें पण खरें !

## १२ : सुखी होण्याचे उपाय

### नव्व्याणवाचें जाळें तोडून टाका.

एका गांवांत एक अति श्रीमंत मनुष्य रहात होता. तसाच त्या गावांत अति गरीब पण केवळ श्रमोपजीवि गृहस्थ रहात असे. तो श्रीमंत गृहस्थ सर्व सुखसोयींनी समृद्ध व अपार द्रव्याचा मालक होता. पण तो नेहमी कष्टी व चिंतातूर असे. ह्याच्या उलट तो गरीब मनुष्य धट्टाकट्टा, निरोगी व नेहेमी आनंदी असे. तो सुप्रभाती उठे. कामधंद्यावर जाई व जी कांहीं कमाई त्या दिवशीं होई, ती खर्चून जरूर तो दाणागोटा, शाक-भाजी व इतर जरूरीच्या उदरनिर्वाहापुरेशा मिळतील त्या वस्तू आणाव्या व त्यावर त्या उभयतां नवराबायकोनें जगावें. संग्रह करावा, हा विचार व ह्या भावना त्यांना कधीं शिवल्याच नाहीं. तीं उभयतां सुखानें झोंपत, काळजी व चिंता कशाची हें त्याच्या ध्यानीं मनीहि नसे. तीं उभयता नेहेमी समाधानी असत ! कारण त्यांच्या गरजा पण कमी व त्यामुळें आशा-अपेक्षाही कमी. सारांश, त्यांच्याजवळ धट्टीकट्टी गरिबी होती.

याच्या उलट ह्या श्रीमंतापाशीं लुळीपांगळी श्रीमंती होती ! हव्यास व आशा ह्यांचें तो माहेरघर होता. या त्याच्या हव्यासी हावऱ्या वृत्तीमुळें तो नेहमीं चिंतातूर व असमाधानी असे. शांतता ही त्याच्या चित्ताला

कधीं शिवलीच नाहीं. अशा स्थितींत एक संन्यासी सत्पुरुष त्याच्याकडे आला. तेव्हां त्या श्रीमंत मनुष्यानें आपली कर्मकहाणी त्या संन्याशाला निवेदन केली व त्यावर उपाय काय? मला सुख-समाधान कशानें मिळेल तें सांगा. असाही प्रश्न त्यानें त्यापुढें टाकिला.

त्यावर तो संन्यासी उत्तरला, "यावर उपाय फार थोडा व सोपा आहे. तो म्हणजे तूं जो हांवरा हव्यास धरितोस तो सोडून दे. जरुरी-पेक्षां जास्त संपत्ति असेल ती वाटून टाक म्हणजे तुला सुख व समाधान ही दोन्ही मिळतील. एवढेंच नव्हे तर याचें प्रत्यंतर दाखविण्यास व अनुभव आणून देण्यास मी तयार आहें."

अनुभव घेण्यासाठीं तो श्रीमंत मनुष्य त्या संन्याशाच्या सांगण्याप्रमाणें करण्यास तयार झाला. तेव्हां त्या संन्याशानें त्याला अशी युक्ति सांगि-तली व असा सल्ला दिला कीं, "तूं एका पिशवींत ९९ रुपये भर व ती पिशवी त्या गरिबाला न समजूं देतां त्याच्या घरांत नेऊन टाक व मग आपण दोघे काय घडतें तें पाहूं."

त्यानंतर लगेच त्या श्रीमंताने त्या संन्याशाच्या सांगण्याप्रमाणें एका पेटींत ९९ रुपये असलेली थैली ठेवून ती पेटी त्या गरिबाच्या घरीं त्यांना न समजतां नेऊन ठेविली.

रात्रीं निजण्यापूर्वीं त्या गरीब नवरा-बायकोला ती पेटी अचानक आढळली. ती त्यांनीं लगेच उघडून पाहिली. तों त्यांत फक्त ९९ रुपये म्हणजे शंभराला एकच कमी, एवढी रक्कम आढळली. त्या घटनेबद्दल त्यांनीं पुष्कळ विचार केला, पण एवढीच रक्कम कोठून कशी व कां आली ह्याबद्दल त्यांच्या मनाला पटेसें उत्तर मिळालें नाहीं! ही देणगी परमेश्वरानेंच आपल्याला दिली असें समाधान मानून त्यांनीं असें मनाशीं ठरविलें कीं, आपण या रकमेंत एक रुपया भर घालून रुपये शंभर करूं. म्हणजे सध्यांचें काम संपलें. पण हा एक रुपया कसा जमवावा याचा

विचार सुरू झाला. नित्यच्या अल्प मजुरींतून एकदम एक रुपया बाजूला काढून त्या ९९ रुपयांत भर घालून ते शंभर करणें ही गोष्ट तर त्यांना अशक्यच होती ! ‘ नव्याणवाचे शंभर ’ हा मोह त्यांना अनावर झाला, त्याची चिंता त्यांच्या मनांत काहूर माजवूं लागली ! तोंच त्यांना अशी एक क्लृप्ती सुचली कीं एक दिवसाआड एकदां आपण उपाशीं रहावयाचें व अशा रीतीनें एक रुपया वांचवून तो त्या रकमेंत भर घालून नंतर शंभर रुपये पूर्ण करावयाचें असा निर्णय घेऊन त्या आशा-वादी चिंतेत तीं उभयतां झोंपलीं. व दुसऱ्या दिवशीं नेहमींप्रमाणें चूल पेटवून स्वयंपाकादि योजना अंमलात न आणितां तीं तशींच उपाशीं राहिलीं !

दुसऱ्या दिवशीं तो संन्यासी व तो श्रीमंत मनुष्य हे उभयतां मुद्दामच म्हणून त्यांच्या घरावरून जाऊं लागले. तेव्हां त्यांना घरांत सर्व सामसूम दिसली. हें पाहून तो संन्यासी त्या गरिबाच्या घरीं जाऊन नित्याच्या आनंदांत, गडबडींत व काबाडकष्टांत खंड कां पडला याबद्दल त्यानें त्या गरिबापाशीं चौकशी करण्यास सुरवात केली. तेव्हां त्या संन्याशाजवळ कसलाहि विचाराचा आडपडदा न ठेवितां त्या गरिबानें घडलेली हकीगत व त्यावर त्यानें योजलेला उपाय व त्याची कृति ह्या गोष्टी त्या संन्याशाला सांगितल्या. त्या सांगत असतांना त्या गरिबाच्या मनाची तळमळहि त्या श्रीमंत माणसाच्या लक्षांत आली !

नंतर तो संन्यासी श्रीमंत माणसासह त्याच्या घरीं आला व त्याला म्हणाला, “ आणखी एकदोन महिन्यांनीं तूं पुनः नव्याण्णवाचा प्रयोग त्या गरीब माणसावर कर व मग पुनः बारकाईनें त्याच गरीब माणसाची दिनचर्या त्याचें शरीर व त्यावर झालेले द्रव्यतृष्णेचे परिणाम नीट ध्यानांत घे आणि मग सुख शांति व समाधान हीं कोठें व कशीं मिळतात ह्याचा विचार कर. द्रव्यसंग्रहांत वा द्रव्योपभोगांत अथवा द्रव्याभिलाषेंत खरें

सुख, समाधान व शांति ह्यांपैकीं एकहि मिळत नसून उलट त्याच्या (द्रव्याच्या) त्यागानेंच वरील तीनही गोष्टी मिळतात, हें तत्त्व तुझ्या ध्यानांत येईल. आम्ही संन्यासीच द्रव्यमोहापासून दूर असतों म्हणून जास्त सुखी, समाधानी असून वैभवशाली असतों. "फकीरी अल्लाको प्यारी अमीरी कौन बिचारी ?" ह्यांतील खोंच व मर्म हीं तुझ्या ध्यानांत आल्याशिवाय रहाणार नाहीं. इति शम्" असें बोलून तो संन्यासी निघून गेला तो गेलाच!

**बोध : सुख हें त्यागामुळेंच मिळतें. भोगामुळें मिळत नाहीं.**

## १३ : श्रीमंत संन्यासी व भिकारी राजा

एक संन्यासी होता. तो आपल्याजवळ पै-पैसा, आणा अशीं थोडीशीं लहान नाणीं ठेवून तीं तो मुलांना वांटून टाकीत असे. एकदां कांहीं गरीब लोक त्यापैकीं कांहीं पैसे मिळावे म्हणून त्या संन्याशाभोंवतीं जमा झाले. इतक्यांत एक राजा हत्तीवरील अंबारींत बसून लवाजम्यासह त्याच रस्त्यानें आला.

त्या संन्याशाभोंवती गरीब लोकांचा घोळका पाहून तेथें थांबला. हें पहातांच तो संन्यासी झटकन् पुढें आला व आपल्या हातांतील दोनतीन पैसे त्या राजाच्या अंबारींत त्यानें फेकिले व पुनः आपल्या जाग्यावर बसला.

ही अनपेक्षित व चमत्कारिक घटना व कृति पाहून तो राजा आश्चर्यचकित झाला आणि त्यानें त्या संन्याशाला बोलावून वरील कृतीचें कारण विचारिलें.

त्यावर तो संन्यासी शांतपणें पुढें होऊन उत्तरला, " राजे महाराज, मी कधीं कधीं असें दान अगदीं भिकारी किंवा गरीब असतील त्यांनाच देत असतों. पण सुदैवानें आज तुमच्याइतका भणंग भिकारी दुसरा कोणीच आढळला नाहीं म्हणून तो पै-पैसा तुमच्यासारख्या अतिहीन भिकाऱ्यालाच मिळावा म्हणून मी अंबारींत फेकला. तोसुद्धां आपल्या-करितांच आहे ! "

यावर " हें कसें ? मीच खरा भिकारी कसा " असा प्रश्न त्या राजानें त्या संन्याशाला केला. त्यावर तो संन्यासी म्हणाला, " राजा, तुझ्या-जवळ अलोट संपत्ती आहे. वैभव आहे, मोठें राज्य आहे. असें असून तूं आणखी संपत्ति मिळविण्याची हांव धरून ती पुरी करण्यासाठीं धडपड करीत आहेस. आणखीं राज्यें मिळविण्यासाठीं तयारी करीत आहेस. तुझी साम्राज्यतृष्णा अजून शमली नाहीं. याचा अर्थ असा कीं, ' आणखी कांहीं हवें आहेच ' ही असंतुष्ट असमाधानी मनाची अवस्था व स्थिति तूं मनानें किती भिकारी व हव्यासलेला आहेस हेंच दाखविते नाहीं का ? म्हणून मी तुझ्या भिकारी स्थितीला शोभेल असें दीडदमडीचें दान केलें !"
**फकिरी खुदाको प्यारी अमिरी कौन बिचारी ?"**

**बोध : समाधान हीच श्रीमंती, हेंच वैभव, हेंच खरें सुख, मनाचा श्रीमंत तोच खरा श्रीमंत. अमर्याद हांव व तृष्णा असणारें मन हेंच अति कनिष्ठ प्रतीचें भिकारी !**

## १४ : आपले डोळे काढून देणारा साधू

एकदां एक साधू उदरनिर्वाहापुरेशी भिक्षा मागण्याच्या हेतूनें एका गांवांत आला. तेव्हां एका स्त्रीनें एक उत्तम रुचकर पदार्थ त्याला दिला.

ती भिक्षा घेऊन तो साधू गांवाबाहेर नदीकांठीं गेला व नेहमींच्या पद्धतीप्रमाणें ती भिक्षा त्यानें नदीच्या पाण्यांत धुतली व मग खाल्ली. पुन्हां दुसऱ्या दिवशीं पण ती स्त्री त्या साधुसाठीं तसेंच उत्कृष्ट अन्न तयार करून त्याची वाट पहात बसली. तितक्यांत तो साधू आला. तिनें त्याला ती भिक्षा घातली. व तो साधु नित्याप्रमाणें जंगलांत निघून गेला. त्यानें भिक्षा धुतली व मग खाल्ली.

तिसऱ्या दिवशीं पण ती स्त्री तसेच उत्तमोत्तम पदार्थ तयार करून तो साधू येण्याची वाट पहात बसली. पण साधु आला नाहीं. तो उशिरानें आला. तोंच मोठ्या उत्सुकतेनें व प्रेमानें ते पदार्थ त्याच्या भिक्षापात्रांत तिनें घातलें. पण हळूच पुटपुटली "महाराज, तुमचे ते तेजस्वी डोळे इतके आकर्षक, मनमोहक, व हृदयाला चटका लावून ओढणारे आहेत कीं ते एकसारखे पहातच बसावें. म्हणून मी रोज तुमची सारखी वाट पहातच बसतें. माझ्या डोळ्यांनाही त्यामुळें जास्तच ताण पडतो."

हें ऐकून तो साधू ती भिक्षा घेऊन तसाच पुढें दुसऱ्या घरीं गेला. तेथें त्या घरांतील माउलीनें मोठ्या आनंदानें, वात्सल्यपूर्ण भावानें तशीच उत्कृष्ट भिक्षा त्या साधूला घातली. ती घेऊन तो साधु नेहमीप्रमाणें नदीकाठीं गेला. तेथें त्या दुसऱ्या माउलीची भिक्षा पाण्यांत भिजवून शुद्ध करून मगच ती त्यानें खाल्ली.

नंतर ती पहिल्या स्त्रीचीं भिक्षा त्यानें नदींत फेकून दिली आणि सळई मिळवून ती तापवून लाल करून त्या सळईनें आपलीं दोन्ही डोळ्यांचीं बुबुळें काढून तीं एका हातरुमालांत गुंडाळून ठेविलीं !

चवथ्या दिवशीं तो साधु—आतां अंध झालेला—हातांत काठी घेऊन रस्ता चांचपडत चांचपडत डोळ्यांसाठीं आतुर झालेल्या त्या पहिल्या स्त्रीच्या दारासमोर येऊन उभा राहिला ! ती स्त्री त्याची वाटच पहात

होती. पण तो साधू नतमुद्रच–खालीं मान घालून–उभा राहिला. तिनें प्रथम पूर्वीप्रमाणेंच उत्तमोत्तम पदार्थ त्या साधूला देण्यासाठीं पुढें केले. तों साधु मोठ्या नम्रतेनें व समाधानी वृत्तीनें तिला म्हणाला, "माताजी, ज्या डोळ्यांची तुम्हांला तहान लागली होती, जे डोळे तुम्हांला मनापासून आवडले होते, हवे होते, ते हे घ्या. आपलें मन तृप्त करा. हे डोळे आतां तुमचे झाले, तुम्ही यांचे वाटेल तें करा. ते आतां माझे नाहींत. हात जोडून विनंति ही कीं, मला माझ्या अध्यात्म साधनांत अल्पहि व्यत्यय आणूं नका." असें म्हणून तिची भिक्षा न घेतां तो तसाच सरळ चांचपडत आपल्या जंगलांतील झोपडीकडे निघून गेला. सर्वव्यापी परमेश्वरानें त्या साधूचा उदरनिर्वाह जागच्या जागींच चालविला! पण त्या आषिक स्त्रीला काय वाटलें असेल? तिच्या मनाला धक्का बसला असेल का? तो कशाबद्दल? व कां?

म्हणून जो जो पदार्थ, जें जें इंद्रिय, जे जे सगेसोइरे–आई, बाप, पुत्र, मित्र, बहीण, भाऊ, बायको, संपत्ति, वैभव यांपैकीं जे जे कोणी तुमच्या परमात्मप्राप्तीच्या आड येत असेल, प्रभुचिंतनाच्या किंवा भेटीच्या आड येत असेल, ज्याची तुम्हांला त्या मार्गांत अडचण वाटेल, तो तो वा तें तें बाजूला करा. त्याची कींव करूं नका; त्याचा संबंध तोडा. तुकारामबोवांनीं डोळे, नाक, कान इत्यादि कर्मेंद्रियें कशीं तोडावीं व प्रभुचरणीं जोडावीं हें अभंगांनी सांगितलें तें असें. डोळे तुम्ही घ्यारे सुख। पहा विटोबाचें मुख। कान तुम्ही आइका हो। माझ्या विठ्ठलाचे गुण गा हो। इ. इ.

**बोध :** 'देवाच्या सख्यत्वासाटीं। पडाव्या जिवलागांसि तुटी। प्राण तोही शेवटीं। अर्पावा' हेंच खरें.

## १५ : याचें नांव दिव्य प्रेम

इराणी वा पर्शियन भाषेतील एक दिव्य प्रेमकथेची गोष्ट. लैला ही एक स्त्री मजनू* नांवाच्या पुरुषाइतकें प्रेम करी कीं ते दोन देहधारी जीव शरीरदृष्ट्या भिन्न असूनही त्यांचे आत्मे कमालीचे एकजीव होऊन गेलेले होते.

एकदां लैलाची प्रकृति बिघडली ! तिला चैन पडेना. जीव घाबरा होई. म्हणून तिची प्रकृती पाहून औषधोपचार करण्यासाठीं एका हकीमाला ( वैद्याला ) बोलावण्यांत आलें. त्याला तिच्या त्या बेचैनीचें, तिच्या त्या अवस्थेचें नीटसें निदान झालें नाहीं. म्हणून तिचें रक्त तपासावें व मग जरूर उपचार करावा, औषध द्यावें किंवा सुई टोचावी असें त्यानें ठरवून तिचें अल्पसें रक्त घेण्यासाठीं तिचा हात पुढें घेऊन त्यांतील रक्त काढण्यासाठीं तिला सुई टोचली. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं तिच्या हातांतून वा अंगांतून रक्तच आलें नाहीं !

मजनू जवळच होता. त्याच्या हातांतून मात्र सुई टोचतांच रक्त भळभळा बाहेर आलें ! व तें तसें बाहेर आल्यावर लैलाला बरें वाटूं लागलें. कांहीं वेळानें मजनूच्या हातांतून रक्त येण्याचें बंद झालें व लैलाला बरें वाटलें !

केवढी ही दोन जीवांची एकात्मता ! केवढें हें जीवैक्य ! केवढें हें दिव्य प्रेम !

---

* लैला मजनू ह्यांच्या दिव्य प्रेमी जीवनावर पर्शियन भाषेंत फार मोठें काव्य व अमर असा इतिहास भरलेला आहे कीं भारतांतहि “ लैला मजनू नाटक कंपनी ” असून महिना महिना रोज १२–१२ तास असें त्यांच्या जीवनावरचें नाटक ‘ हाउस फुल ’ चालतें. त्या भागांतील तें एक दिव्य महाभारतच आहे. याप्रमाणें “ शीरी फरहाद ” ह्या दिव्य प्रेमी जोडप्याबद्दल तितकें मोठें व त्याच स्वरूपाचें कादंबरीमय काव्य आहे.

**बोध** : खरें प्रेम असें असतें. केवळ वैषयिक प्रेम अशा दिव्य स्थितीचें नसतें. **अशी एकरूपता, अशी दिव्य एकात्मता जेव्हां देवाशीं-शिवाशीं-जिवाशीं होईल तोच आत्मसाक्षात्कार !** मीराबाई व गोपी ह्यांची अवस्था अशी होती.

## १६ : हें प्रेम बालकावरचें का आत्म्यावरचें

एकदां एक सभ्य गृहस्थ आपल्या कचेरींत टेबलावर काम करीत बसला होता. त्याचा जीव नुकत्याच जन्मलेल्या मुलावर होता. तो कामांत दंग होता. इतक्यांत शेजारच्या टेबलावरील दूरध्वनीची (टेलिफोनची) घंटा वाजली. ती ऐकतांच तो ताडकन उठला व दूरध्वनीमधील संदेश ऐकण्यासाठीं पुढें जाऊं लागला; तोंच त्याची छाती धडधडूं लागली. तो बेचैन झाला, त्याच्या मनांत कालवाकालव सुरू झाली. छाती धडधडूं लागली ! असें म्हणतात कीं, भावी दुर्घटनांची छाया आगाऊच आपल्या अंतःकरणावर पडत असते ! तसेंच घडलें.

दूरध्वनीचा तो संदेश ऐकण्यासाठीं वाटी कानाला लावून निरोप ऐकतांच त्याचा चेहरा एकाएकीं उतरला. गालावरची व ओंठावरची लाली जाऊन सर्व चेहरा अगदीं पांढरा पडला !! तो तसाच फोन (दूरध्वनी) खालीं ठेऊन ऑफिसांतून घरीं जाण्यासाठीं कपडे चढवून निघाला. रिवाजाप्रमाणें वरिष्ठ अधिकाऱ्याच्या कानावर गोष्ट घालणें, त्याची परवानगी घेणें वा शेजाऱ्याला कांही सांगणें, निदान चिटी लिहून ठेवणें वा शिपायाला तरी 'घरीं जातों' असें बोलणें यांपैकी एकहि गोष्ट त्यानें केली नाहीं ! इतका तो घरीं जाण्यास उतावळा झाला ! घाबरला होता.

इतक्यांत एक पोस्टमन त्याची तार घेऊन आला. त्या तारेंत त्याला त्याच्या लॉटरीच्या तिकिटाचे दहा हजार रुपये मिळाल्याचें होतें. पण ही व्यावहारिक आनंद देणारी बातमी पण त्याच्या घाबरलेल्या

उतावळ्या व चिंतातूर मनाला थांबवून उत्साही करूं शकली नाहीं!

एवढेंच काय? रस्त्यावर मोटार हेरण्यासाठीं समोरच असलेल्या मोटारीपाशीं तो गेला. तो तींत ज्यानें याच्यावर मोठे उपकार केले होते असा एक मोठा अधिकारी बसला होता. तो पहातांच यानें साधा औपचारिकपणा सोडून विरुद्ध दिशेस तोंड फिरविलें!

तोंच त्याच्या चांगली परिचयाची एक हास्यमुखी सुंदर स्त्री त्याच्या समोर दिसली व त्याजकडे आली. पण तिच्याशीं देखील न बोलतां दुसऱ्या मोटारीकडे तो धांवला व तींत बसून "जल्दी चलो" असें ड्रायव्हरला सांगून घराकडे निघाला.

इतका गोंधळ, घाबरलेपणा, गडबड, त्याच्या मनांत कोणत्या कारणांमुळे झाली असावी? अशी कोणती मोठी चिंता त्याच्या मनाला लागली होती? इतका चिंतातूर हळवेपणा त्याच्या मनांत कां उत्पन्न झाला होता?

अशा मनःस्थितींतच ती मोटार त्याच्या घराशीं येऊन थांबली. मोटारींतून उतरतांच त्याला काय दिसलें? आपलें सर्व घर चारी बाजूंनीं पेटलेलें! सर्व सामान व चीजवस्त धडाधड जळत आहे. आपले आई-बाप, बहीण-भाऊ बायको हीं मात्र सर्व सुरक्षित त्याच्याजवळ येऊन रडत आहेत, पण त्याचें तान्हें बालक मात्र कोणाजवळच दिसेना!

घराला आग लागल्याची बातमी त्याला दूरध्वनीवर समजली होती हें खरें. पण तेव्हांच त्या पाळण्यांत झोंपलेल्या छकुल्याचें काय झालें त्याला घराबाहेर नेण्याचें भान कोणालाच राहिलें नाहीं. त्याच्या चारी बाजूंनीं ज्वाळा भडकतच चालल्या आहेत हे विचार त्याच्या मनांत ही बातमी ऐकतांच आले! आगीचें तें तसें दृश्य त्याच्या मनश्चक्षूंपुढें तेव्हांच उभें राहिलें होतें. त्यामुळें तो इतका व्याकूळ व वेडापिसा झाला होता.

आग भडकतच होती म्हणून तो व त्याचीं सर्व नातेवाइकें, आँग विझविणाऱ्या लोकांना, अग्निशामक दलाच्या लोकांना काकुळतीस येऊन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५५९१० दि. ...
ग्रंथांक ३५०३ ....नोंद दि. २८।३।६५


" माझ्या छकुल्याला, माझ्या तान्हुल्याला वाचवा हो, मागाल तितके पैसे देऊं. जन्माचे ऋणी होऊं " इत्यादि विनवण्या करीत होते !

विचार करण्यासारखी गोष्ट. पहिलेंच अपत्य. लहान बाळ हें त्यांच्या जीवाचा प्रेमविषय असणें हे अगदीं योग्य व साहजिक आहे. कोणतेंहि लहान बालक ही हृदय ओढणारी, हृदयाला चटका लावणारी वस्तूच. ती त्या त्याच्या व्यवहारतः हृदयींच्या जिव्हाळ्याकरितां, त्या गृहस्थानें नोकरीच्या चौकटींतील एकहि कर्तव्य पाळिलें नाहीं, उपकारकर्त्या-बद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचें भानहि त्याला राहिलें नाहीं, अथवा औपचारिक किंवा माणुसकीचें गमक म्हणून त्या परिचित भगिनीला नुसता नमस्कार किंवा स्मितहास्य करण्याचेंही कार्य त्याच्याकडून घडलें नाही ! इतकी विमनस्कता कां ? कारण तें बालक. हें कारण जरी वरकरणी बरोबर आहे, त्याला वाचविण्याकरिता सर्व संपत्ति देण्यासाठी तो बाप तयार आहे इतकें प्रेम, इतका त्याग त्या बालकासाठीं करण्यास तो तयार आहे तर मग ती आई किंवा तो पिता आपण स्वतः त्या बालकाला वांचविण्यासाठीं आगीच्या डोंबात तितक्याच कळकळीनें आपले स्वतःचे प्राण खर्च करण्यास तयार झाली का ? ह्याचें उत्तर काय ? बाल-काच्या जीवापेक्षां आपला स्वतःच्या जिवावरील प्रेम, जिव्हाळा, आत्मी-यता हीच श्रेष्ठ असें नाहीं का वाटत ? पुरांत बुडणाऱ्या वानरीनें आपली लेंकरें डोक्यावर घेऊन, त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नांत पूर वर वर येतो पाहून अखेरीस त्याच पिलांना स्वतःच्या पायाखालीं घालून आपलाच जीव वांचविला ना ? मग सांगा, खरें प्रेम स्वतःच्या जिवावर का त्या दुसऱ्या जिवावर ? ' सबसे जीव प्यारा ' हें जर खरें तर तो तरी ' प्यारा ' कां ?

बोध : तो जीव तो परमात्म्याचा अंश हाच खऱ्या सुखाचा, खऱ्या आनंदाचा ठेवा आहे असें नव्हे का ठरत, वाटत वा सिद्ध होत ? खरें सुख, खरा आनंद कोठें बाहेर नसून आंत आ

म. ग्रं. सं. ठाणें. वाचनालय शाखा.
१२२६२ नों. दि. ... ....
IRBK-0112272
दि. २०।३।१९६५ ...